# ‘कठीण परिस्थितीतील प्रगतीचा दिला मूलमंत्र’

लोकमत न्यूज नेटवर्क

**बेल्हा:** कठीण परिस्थिती असताना देखील डगमगून न जाता परिस्थितीवर मात करून प्रगतीचा मूलमंत्र व आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला घालून दिला. असे प्रतिपादन प्रा. प्रल्हाद शिंदे यांनी केले.

निमगाव सावा येथील दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ व इतिहास विभाग यांच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन केले.



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादनप्रसंगी मान्यवर.

त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव येथील प्रा. अर्चना अवताडे यांनी प्रतिमा पूजन केले. या कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.नितीन मोजाड, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. राहुल सरोदे व इतिहास विभाग प्रमुख प्रा. नीलम गायकवाड यांनी केले. यावेळी उपस्थित संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य डॉ. छाया जाधव, प्रा.प्रकाश कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. शिवाजी साळवे यांनी केले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Dec 08, 2023
Powered by: erelego.com